*This Question Paper contains 7 printed pages.*
*(Sections - A, B, C & D)*

Sl.No.

000637

# 03 (M)

**(JULY, 2022)**

---

***Time : 3 Hours]*** ***[Maximum Marks : 80***

**सूचना :**

1) हस्ताक्षर स्पष्ट लिहा.
2) या प्रश्नपत्रिकेमध्ये चार विभाग करण्यात आलेले आहेत.A, B, C आणि D व एकूण 1 ते 50 पर्यंत प्रश्न क्रमांक आहेत.
3) सर्व प्रश्न अनिवार्य आहेत. प्रश्नांचे विकल्प आंतरिक आहेत.
4) उजवीकडील अंक गुण दर्शवितात.
5) आवश्यक तेथे स्वच्छ आकृत्या काढा.
6) नवीन पानावर नवीन विभाग लिहा. प्रश्नांची उत्तरे अनुक्रमे लिहा.

---

## विभाग – 'A' (गद्य)

■ योग्य जोड्या जुळवा : **[4]**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| 1) द्विजगोरक्षण | अ) आनंद यादव |
| 2) संभाजीस पत्र | ब) इंदिरा संत |
| 3) मिळवती होतांना | क) समर्थ रामदास |
| 4) छात्रालयातील आठवणी | ड) म्हाइंभट |

■ खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा : [2]

5) पगार होताच रामुने वैनी जवळ काय मागितले?

6) गाडगेबाबांनी कोणत्या यज्ञाचा प्रारंभ केला?

■ खालील प्रश्नांची दोन-तीन वाक्यात उत्तरे लिहा : [6]

7) आरमारासाठी आवश्यक लाकडांसाठी कोणते वृक्ष तोडावे?

8) वानराला बघून लोहार काय बोलला?

9) सावरकर बारीला देशद्रोही का म्हणतात?

किंवा

महाराजांच्या प्रसंग परत्वे भाषणात कोणत्या गोष्टींचा उल्लेख असे?

■ खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा : [8]

10) भोवरा कसा बनवला जातो? भोवऱ्याचा खेळ कसा खेळला जात असे?

11) लेखकाने आपल्या आईदादांच्या कोणत्या काल्पनिक आठवणी सांगितल्या?

किंवा

धनाढ्य व्यापाऱ्याच्या घरी लेखकाला कोणता अनुभव आला?

## विभाग – 'B' (पद्य)

■ खालील दिलेल्या विकल्पांपैकी योग्य विकल्प शोधून रिकाम्या जागा भरा : [4]

12) ज्ञानेश्वरांच्या मुळ गावाचे नांव ................ आहे.

अ) आपेगाव  ब) आळंदी

क) देहू  ड) पैठण

13) कवीच्या कवितेचा हात .............. असावा.

अ) कोमल  ब) ओबड–धोबड

क) काळा–सावळा  ड) गोरा

14) "दुपार" या कवीतेतील वर्णन .............. वेळचे आहे.

अ) रात्रीचे  ब) सायंकाळचे

क) दुपारच्या  ड) सकाळचे

15) 'श्रावणझड' या कवितेचे कवी .............. आहेत.

अ) केशवसूत  ब) बालकवी

क) बाबा आमटे  ड) अनिल

■ खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा : [2]

16) 'दुपार' या कवितेतील सून काय करीत आहे?

17) जवानाच्या घरासमोर कशाचे झाड आहे?

■ खालील प्रश्नांची दोन–तीन वाक्यात उत्तरे लिहा : [6]

18) 'ज्ञानेश्वरांनी' लावण्याचा पुतळा कोणाला उद्देशुन म्हटले आहे?

19) बाबा आमटे यांनी कणाकणाने माती कशी जागवली?

20) काट्याकुट्यांत हिरवळ जतन करावी यातील भावार्थ समजवा?

किंवा

विलायती वेशातील लोकांना कशाची उपमा दिली आहे? का?

■ खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा : [8]

21) 'श्रावणझड' या कवितेच्या आधारे 'श्रावणातल्या पावसाचे' वर्णन करा?

22) 'दुपार' या कवितेत कविने दुपारचे केलेले वर्णन तुमच्या शब्दात लिहा?

किंवा

जवानाने गावकऱ्यांना कोणता संदेश दिला आहे? का?

## विभाग – 'C' (व्याकरण)

■ खालील प्रश्नांची सुचने प्रमाणे उत्तरे लिहा :

■ वाक्य रुपांतर करा : [2]

23) आज चाडीत अतोनात गर्दी होती. (उद्गारार्थी वाक्य तयार करा)

24) अपमान केल्यास कुणाला राग येत नाही? (होकारार्थी वाक्य तयार करा)

■ वाक्य संश्लेषण करा : [2]

25) तुम्ही चहा घ्या किंवा कॉफी घ्या. (केवल वाक्य करा)

26) आम्ही घराबाहेर पडताच पावसाला सुरूवात झाली. (संयुक्त वाक्य करा)

■ खालील समास ओळखा : [2]

27) आजन्म

28) नीलकंठ

■ समानार्थी शब्द लिहा : [2]

29) आई

30) सुर्य

■ विरूध्दार्थी शब्द लिहा : [2]

31) नास्तिक

32) स्पृश्य

■ खालील उदाहरणांचे अलंकार ओळखा : [2]

33) गडद निळे गडद निळे जलद भरूनि आले.

34) काय वसंतराव, तुम्हाला सुपारी लागते का?

■ खालील वाक्प्रचारांचा अर्थ लिहा : [2]

35) राग निपटून काढणे

36) वसा घेणे

■ शब्दसमुहासाठी एक शब्द लिहा : [2]

37) स्वच्छतेसाठी केलेला यज्ञ.

38) बटाटे घालून तयार केलेला वडा.

■ खालील म्हणींचा अर्थ लिहा : [2]

39) पळसाला पाने तीनच.

40) अति शहाणा त्याचा बैल रिकामा.

■ खालील ग्रामीण शब्दांसाठी मराठीतील रुढ शब्द लिहा : [2]

41) रगत

42) शनवार

## विभाग – 'D' (अर्थग्रहण / लेखन विभाग)

■ खालील पैकी कोणत्याही एका विषयावर कल्पना विस्तार करा : [4]

43) मरणात खरोखर जग जगते.

44) यत्न तो देव जाणावा.

45) पत्र लेखनः – तुमच्या शाळेची सहल जाणार म्हणून वडिलांकडून 500/- रुपयाची मागणी करा. (007, राजभवन, शिवाजी चौक, अहमदाबाद) (पत्रलेखन करतांना शाळेचे नांव, तुमचे नांव किंवा सहिचा उल्लेख करु नये) [4]

■ खालील अपठित गद्य उतारावाचून त्याखालील प्रश्नांची उत्तरे लिहा. [4]

सानेगुरुजींचं विज्ञानप्रेम–विज्ञाननिष्ठा ही त्यांची जीवनमूल्यं होती. रामकृष्ण परमहंस, टागोर आणि गांधी यांना ते गुरु मानत. ते म्हणत की, 'माझ्यात त्यांचा पराधांश जरी असला तरी मी सुखी राहीन'. पण त्यांच्यात एक वैज्ञानिक होता. हृदय मही या गुरुंच्या पायाशी असलं तरी त्या गुरुंच्या खांद्यावर चढून पुढलं जग पाहायचं, हा त्यांचा विचार फार स्पष्ट आहे. या साने–विचारांवर अनेक अंगानी विचार व्हायला पाहिजे, असं मला वाटलं. साने–गुरुजींच्या विचारांच परिशीलन जितकं जास्त होईल, तितकं आपल्याला या नव्या युगाच्या वैज्ञानिक आव्हानांकडे पाहायची आणि संधीचा उत्तम उपयोग करायची अधिक क्षमता प्राप्त होईल. तसेच दुसरा विचार असा की, 'गुरुच्या चुका सुधारुन गुरुंच काम पुढे नेणं म्हणजे गुरुभक्ती' हा वैज्ञानिक दृष्टिकोण साने गुरुजींनी पूर्णपणे ओळखला होता. या क्षमतेतून आपण अधिक चांगल्या समाजाकडे जाऊ शकतो. असं मला वाटतं.

प्रश्नः

46) साने गुरुजींची जीवनमुल्ये कोणती होती?

47) साने गुरुजी कोणा–कोणाला गुरु मानत होते?

48) साने गुरुजींचा दुसरा विचार कोणता होता?

49) गुरुच्या खांद्यावर चढून पुढचं जग पाहायचं हा विचार कोणाचा होता?

■ खालील पैकी कोणत्याही <u>एका</u> विषयावर 200 शब्दात निबंध लिहा : [8]

50) शेतकऱ्याचे मनोगत :

मुद्दे : शेतकऱ्याचे रोजचे जीवन .............. शेतकऱ्याची सामान्य सुख दुःख .............. नैसर्गिक आपत्तीमुळे येणारी संकटं .............. त्यांचे प्रश्न .............. शेतीशी निगडीत राजकारण, अर्थकारण, समाजकारण इ. .............. शेतकऱ्यांची व शेतीची परिस्थिती सुधारावी या साठीची तळमळ.

किंवा

पेट्रोल मिळेणासे झाले तर :

मुद्दे : पेट्रोलचे स्थान .............. जीवनाची गती अवलंबून .............. होणारा हाहाकार .............. उर्जेची गरज .............. परिणाम .............. नविन उपायांची गरज .............. सर्व व्यापार व उद्योग ठप्प होण्याची शक्यता .............. त्यावर उपाय योजना.

किंवा

कोरोना एक महामारी :

मुद्दे : कोरोना एक संसर्गजन्य रोग .............. विषाणूचा आकार .............. मानवी शरीरावर होणारा परिणाम .............. सर्व प्रथम 2019 मध्ये चीनच्या वुहान शहरात सापडणे .............. त्याची प्रमुख लक्षणे .............. WHO ची जागतिक घोषणा .............. व्यवहार विस्कळीत .............. त्याची गती .............. त्यावर उपाय योजना .............. कोविड चा अर्थ .............. सरकारी कर्मचारी, डॉक्टर व पोलिस यांची कामगिरी .............. लोकांची मानसिकता .............. त्यावर उपाय योजना व आहार.

⌘⌘⌘